


राष्ट्रवादी
काँग्रेस पार्टी

# अतिश आनंदा बारणे

राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष, पिं.चिं. शहर



# श्री. अतिश आनंदा बारणे

(राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष, पिं.चिं. शहर)

## परिचय :

श्री क्षेत्र देहू व आळंदी दोन्ही दिशेला असणारी तीर्थक्षेत्रे आणि पवित्र इंद्रायणीच्या काठावर वसलेले मोशी गाव. आजही गावचे गावपण सामाजिक सलोखा राखत टिकून आहे. 1997 मध्ये पिं.चिं. पालिकेत समाविष्ट झाले. ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज यांच्यावर अपार श्रद्धा असणारे हे मोशी गाव याच गावातील शेती व वारकरी संप्रदायाचा वारसा जपणारे बारणे कुटुंब. वडील ह.भ.प.श्री आनंदा बारणे यांच्यामुळे लहानपणापासून अध्यात्मिक, सांप्रदायिक बाळकडू अतिश यांना मिळाले. त्याच बरोबर वडील कुस्तीसह, विविध खेळात निपुण असल्यामुळे क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राची आवड निर्माण झाली व मोठे चुलते श्री.सिताराम बारणे यांचे नेहमी मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच बारणे कुटूंबातील मोठे बंधू श्री. बबनराव बारणे हे ग्रामपंचायत सदस्य होते. त्यांच्यापासून कुटुंबाच्या राजकीय कारकीर्दीस सुरुवात झाली. भोसरी विधानसभेचे आमदार विलास लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली समाजकारणात सक्रिय होण्याची संधी अतिश यांना मिळाली. त्यामुळे समाजकारण जवळून अनुभवता आले. नागरिकांच्या हितासाठी कार्य करणारे अतिश सारखे उमदे नेतृत्व विधायक उपक्रमामुळे घराघरात पोहचले. परिसरातील समस्या सोडविण्यावर सर्वाधिक भर असल्याने त्यांचा नागरिकांशी स्नेह जुळला. सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम त्यांच्या मार्फत राबविले जात आहेत. याकरिता विलास लांडे यांच्यासह इतर ज्येष्ठांचे मार्गदर्शन वेळोवेळी त्यांना मिळत आहे.

अतिश यांचे बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. शिक्षणाचे महत्व जाणून जिद्दीने शिक्षणाची कवाडे मोशीमध्ये खुली केली. गरीब व होतकरू मुलांना शिक्षण मिळावे यासाठी ए.बी. वल्लभ नावाची इंग्रजी माध्यम शाळा सुरु केली. अतिश यांनी बांधकाम क्षेत्रातही आपला ठसा उमटवला. पिंपरी-चिंचवड शहरात सात वर्षात नागरिकांच्या स्वप्नांनातले इमले उभा करण्यास हातभार लागला.




# मनोगत :

समाज कार्य करत असताना अनेक ज्येष्ठांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तसेच राजकीय पद मिळाल्या नंतर समज आणि उमज असणे आवश्यक असते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने दिलेली शहर उपाध्यक्ष पदाची जबाबदारी यशस्वी पार पाडण्याचे आव्हान होते. आयुष्यात मिळालेला अनुभव गाठीशी होता तो कामी आला. निर्धास्तपणे जनकल्याणाची कामे करण्याचे ठरविले. ते अजस्त्र कार्य आजतागायत सुरु आहे. इथून पुढे मागे वळून न पाहता अधिक धाडसाने पावले उचलण्याचे ठरविले आहे. यामध्ये माझ्या जनता जनार्दनाची साथ आहे. लहानपणापासून राष्ट्रवादी पक्षाच्या विचाराने मी प्रभावित आहे. आज राष्ट्रवादी परिवारात सहभागी होऊन कार्य करीत असल्याचा मला अभिमान आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महाराष्ट्रातील जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारा, तरुणांना नेतृत्वाची संधी देणारा पक्ष आहे. पक्ष बळकटीकरणासाठी, पक्षाचे प्रगतशील विचार, पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्यासासाठी एक कार्यकर्ता म्हणून मी सदैव प्रयत्नशील राहील. आदरणीय मा.श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, उपमुख्यमंत्री मा.श्री. अजितदादा पवार यांच्या विचारांचा पाईक आहे. मला विश्वास आहे की, आगामी निवडणुकीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकेल.

**श्री. अतिश आनंदा बारणे**

राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष, पिं.चिं. शहर



## मा.श्री. शरदचंद्रजी पवार साहेब (अध्यक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणात गेल्या साडे पाच दशकांपासून आदरणीय शरद पवार या नावाचा दबदबा आहे. तळागाळातल्या कार्यकर्त्यांना ओळखणारे, जनतेच्या प्रश्नांची अचूक जाण असलेले दूरदर्शी लोकनेते म्हणजे साहेब. वयाच्या ऐंशीव्या वर्षीही तरुणांना लाजवेल इतकी कामाची प्रचंड ऊर्जा आणि उत्साह त्यांच्यात दिसून येतो. कृषी, उद्योग, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्राची सखोल माहिती त्यांना आहे. महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा आहे आणि हा विचार सर्वदूर पोहोचवायचा असेल तर त्यासाठी सदैव भरीव कार्य करावे लागणार हे त्यांना ज्ञात आहे. फुले, शाहू, आंबेडकरांच्या या महाराष्ट्राला साहेबांसारखा उदात्त आणि सामाजिक दृष्टीकोन असणारा नेता लाभला ही अभिमानास्पद बाब आहे. शेतकरी, कामगार, मजूर, मध्यमवर्गीय, उद्योजक व सर्व पक्षातील राजकीय व्यक्तींना साहेब आपले वाटतात. साहेबांच्या समर्थ नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गेली एकवीस वर्ष सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनांवर दृढ विश्वास ठेवून काम करत आहे.



# मा. श्री. अजितदादा पवार उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य

राजकारणात शिक्षित युवकांची मोठी गरज आहे. त्यात देखील समाजासाठी झोकून देऊन काम करणाऱ्या धाडसी तरुणांची. कायम प्रफुल्लित व आनंदित मनाने पक्ष कार्यात सहभागी होण्याची अतिशची वृत्ती मला भावते. समाजकार्यात नेहमी अग्रेसर असतो. पक्षाच्या संघटनात्मक कामात त्याचा नेहमी सहभाग असतो. आम्ही राज्यभर फिरताना कार्यकर्त्यांसोबत संवाद साधत असतो. जेव्हा पाया मजबूत असतो तेव्हा भिंत ढासळत नाही. ते काम नक्कीच अशा जागरूक कार्यकर्त्यांमुळे होते. ते अतिशने केले आहे. असे युवा नेतृत्व राष्ट्रवादी पक्षाला लाभले आहे. अतिशचे मनापासून कौतुक आहे. अशीच झेप त्याने भविष्यात घेत राहावी. या माझ्या सदिच्छा आहेत.



# मा. श्री. जयंत पाटील साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष

पक्षकार्याचा आढावा, सभा किंवा बैठका असो. जिल्ह्यातील पदाधिकारी, जनतेशी व निष्ठावान कार्यकर्त्यासोबत गाठीभेटी ठरलेल्या असतात. त्यात आवर्जून भेट होते ती युवा तरुण नेतृत्वाची म्हणजेच अतिश बारणे यांची.
खास गप्पा व विविध विषयांवर सांगोपांग चर्चा नेहमी होत असते. आत्तापर्यंत बऱ्याच वेळा बारणे यांच्या सोबत विविध विकास कामावर चर्चा करून पक्षाच्या पायाभरणीविषयी मोशीमध्ये बैठका घेतल्या आहेत.
अतिश यांच्या कामाची पद्धत भावते. तळागाळातील लोकांसोबत कसे काम करायला हवे हे अतिशला माहित आहे.
हेच समाजकारणाचे सूत्र त्याने पाळले आहे. जमिनीवर पाय रोवून काम करण्याची त्याची पद्धत आहे.
कोणतेही सामाजिक काम तो मनापासून करतो. कोणत्याही कामांत तो मागे हटत नाही. त्याला माझ्याकडून यशस्वी वाटचालीसाठी कायम पाठिंबा व मनस्वी शुभेच्छा आहेत.



## संसदरत्न मा. श्री. अमोल कोल्हे साहेब खासदार शिरूर लोकसभा

कोरोना काळात अतिशने खूप मोठी कामगिरी केली. त्या काळात प्रत्येक क्षण महत्वाचा होता.
अशा बिकट परिस्थितीत चार रुग्णवाहिका मोफत उपलब्ध केल्या. रुग्णांसाठी रुग्णवाहिका हि रक्तवाहिनी आहे.
त्यामुळे अशा कठीण काळात समाजाभिमुख काम करणाऱ्या अतिश सारख्या युवकांची गरज राजकारणात आहे.
अतिश यांनी जनतेच्या समस्यांसाठी अनेकदा भेट घेतली आहे. इंद्रायणी नदीचे पावित्र्य राखणासाठी अतिशची धडपड पाहिली आहे.
अनेकदा विविध विषयावर चर्चा करून त्वरित तोडगा काढण्याचा त्याचा अट्टहास असतो. पर्यावरण पूरक गणेशोत्सावाचा
सर्वांनी आदर्श घ्यावा, असे काम त्याने केले आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी पेलणे, पक्ष आदेशानुसार ताकदीने उभे राहणे
हे गुण वाखाणण्याजोगे आहेत. माजी आमदार विलास लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिश खूप चांगल्या पद्धतीने
जबाबदारी पार पाडत आहे. खूप कमी वयात त्याने उत्कृष्ट काम केले आहे. मला नेहमी त्याचा कामाचा अभिमान वाटतो.



## मा. श्री. विलास लांडे पा. प्रथम आमदार, भोसरी विधानसभा

अतिश सर्वात निष्ठावान व उमदा कार्यकर्ता आहे. वडील वारकरी संप्रदायातले असल्याने घनिष्ठ संबंध आहेत.
मोशी प्रभागातील प्रचाराची अतिशय सक्रियपणे व झोकून देऊन त्याने जबाबदारी पार पाडली आहे.
त्याचा मला सार्थ अभिमान आहे. नक्कीच भविष्यात त्याची यशस्वी वाटचाल होणार आहे. मला याची पूर्ण खात्री आहे.



## मा. श्री. संजोग वाघेरे पा. राष्ट्रवादी शहर अध्यक्ष पिं.चिं. शहर

अतिश प्रामाणिक व उत्साही कार्यकर्ता आहे. अगदी कमी वयात अतिशने समाजकार्य करत राजकारणाची धुरा
सांभाळली आहे. जनतेसाठी धावून जाणारा कार्यकर्ता आहे. कायम उत्साह व प्रत्येक कामात त्याचा अग्रभागी
सहभाग असतो. तो नक्कीच भविष्यात उंच शिखर गाठणार आहे.

# कार्यकर्ता म्हणून केलेली सामाजिक कामे

- मोशी परिसरातील नागरिकांसाठी श्री नागेश्वर महाराज मंदिर प्रांगणात चार मोफत रुग्णवाहिकेचे लोकार्पण शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते व ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आले.
- पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडून अपघातांचे प्रमाण वाढले होते. त्यासाठी वेळोवेळी संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याशी चर्चा करून प्रशासनाकडून मोशी येथील रस्त्यांची कामे मार्गी लावण्यात आली.
- मोशी परिसरात इंद्रायणी नदी पात्रात होणारे गणरायाचे विसर्जन टाळून नदी प्रदूषित होऊ नये म्हणून प्रथमच मोशी गावात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी कृत्रिम विसर्जन हौदाची उभारणी केली.
- मदत नव्हे कर्तव्य या भावनेतुन सांगली,कोल्हापूर याठिकाणी पूरग्रस्तांना धान्य वाटप केले.
- महिला सक्षमीकरणासाठी बचत गटांना 25 हजार रुपयांची आर्थिक मदत केली.
- महिलांच्या स्वावलंबीकरणासाठी मोफत मशीन क्लास सुरु केले.
- घोरावडेश्वर मंदिर येथे रस्त्याच्या दोन्ही बाजूने वृक्षारोपण करण्यात आले.
- युवा वर्गासाठी रोजगार महोत्सवाचे आयोजन केले. त्यामुळे गरजू तरुणांना रोजगार उपलब्ध झाला.
- श्री क्षेत्र भंडारा मंदिराला उभारणीसाठी 51 हजार रुपयांची देणगी, श्री कानिफनाथ सेवा ट्रस्ट मंदिर उभारणीसाठी 51 हजार रुपयांची देणगी सुपूर्त करण्यात आली.
- प्रभू श्रीराम मंदिर उभारणीसाठी देणगी स्वरूपात 51 हजार रुपयांची देणगी सुपूर्त करण्यात आली.
- भव्य रक्तदान शिबिर वेळोवेळी आयोजित केले.
- कोविड काळात गरजुंना अत्यावश्यक साहित्य वाटप करण्यात आले.
- पिंपरी चिंचवड शास्तीकर निर्मूलन समितीच्या वतीने 100% शास्तीकरमुक्त जनमोहीम राबविली.
- इंद्रायणी नदीची पवित्रता राखण्यासाठी उपाय योजना कराव्या यासाठी पर्यावरण मंत्री अदित्यजी ठाकरे यांच्याकडे मागणी केली.
- अतिश बारणे युवा मंच व सक्षम सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून वाचनालय, पाणपोई इ. सामाजिक कामात सहभाग.
- मोशी परिसरातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी हेल्पलाईन नंबर सुरु केला. त्याद्वारे नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन सोडविण्यावर भर दिला.

# सर्वप्रथम उचलले पाऊल जनतेसाठी,
# रुग्णवाहिका लोकार्पण रुग्णसेवेसाठी..!

**मोशी परिसरातील नागरिकांसाठी श्री नागेश्वर महाराज मंदिर प्रांगणात चार मोफत रुग्णवाहिकेचे लोकार्पण शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते व ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आले.**








# पाठपुराव्याची दखल

पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडून अपघातांचे प्रमाण वाढले होते. त्यासाठी वेळोवेळी संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याशी चर्चा करून प्रशासनाकडून मोशी येथील रस्त्यांची कामे मार्गी लावण्यात आली. स्थापत्य विभागाने दखल घेऊन मोशी परिसरातील खड्डे त्वरित बुजविले.

## मोशी परिसरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरु

### राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष अतिश बारणे यांच्या पाठपुराव्याला यश

**मोशी-दि. २९ । प्रतिनिधी**

मोशी परिसरातील रस्त्यांवर पावसामुळे खड्डे पडले होते. परिसरातील नागरिकांना या खड्ड्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत होता. तसेच अपघाताची भितीही निर्माण झाली होती. याबाबत राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष अतिश बारणे यांनी खासदार डॉ.अमोल कोल्हे यांच्याशी चर्चा करून, प्रशासनाकडे खड्डे बुजविण्यासाठी पाठपुरावा केला. त्यानुसार अधिकाऱ्यांनी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यास सुरुवात केली आहे.

रस्त्यांवरील खड्डे नागरिकांच्या जीवावर बेतू लागले होते. खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाणदेखील वाढले होते. पावसाळ्यात खड्ड्यांमुळे चाळण



झालेल्या रस्त्यांवरून वाट काढण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. खड्डा चुकवून गाडी चालवत असताना अनेकदा नागरिकांना दुखा-पती झाल्या होत्या. या गोष्टींचे गांभीर्य लक्षात घेऊन राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष अतिश बारणे यांनी खासदार डॉ.अमोल कोल्हे यांच्याशी चर्चा केली.त्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला धारेवर धरून हे काम मार्गी लावले आहे. महापालिका प्रशासनाने रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम सुरु केले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

याबाबत शहर उपाध्यक्ष अतिश बारणे म्हणाले, माझ्या परिसरातील नागरिकांना कुठलाही त्रास किंवा समस्या येऊ नये यासाठी आपण व आपला मित्र परिवार दक्ष असतो. माझ्या परिसरातील नागरिकांचे संरक्षण ही आमची जबाबदारी आहे.

# इको फ्रेंडली गणपती बाप्पा हाच आमचा संकल्प,
# निसर्गाची हानी टाळा, हाच एकमेव विकल्प..!

दरवर्षी इंद्रायणी पात्रात होणारे गणरायाचे विसर्जन टाळून नदी प्रदूषित होऊ नये म्हणून प्रथमच मोशी गावात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी कृत्रिम विसर्जन हौदाची उभारणी केली. यंदाचा गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा झाल्याने प्रथमच मोशीमध्ये गणेश मंडळांना वृक्ष गजानन पर्यावरणपूरक श्रींच्या मूर्ती भेट देण्यात आल्या. प्लॅस्टर ऑफ पॅरिसची मूर्ती न घेता अंगणी तुळस लावण्याचे आवाहन अतिश यांनी नागरिकांना केले. औषधी तुळशीचे रोपटे या माध्यमातून सर्वांना मिळाले. शिवाय हे विसर्जन घरातूनच सर्वांना शक्य झाले. या उपक्रमास स्थानिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.





पुढारी

मोशी गणेशोत्सवाचे उद्‌घाटन करताना विक्रांत लांडे. सोबत अतीश बारणे, संजय नेवाळे, यश साने, नीलेश बोराटे, उत्तम आल्हाट आदी.

## मोशीतील पर्यावरणपूरक उत्सवाचा आदर्श घ्यावा

पिंपरी: पुढारी वृत्तसेवा

मोशी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष अतिश बारणे यांनी सुरू केलेली पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पनेचा आदर्श सर्व शहरवासीयांनी घेणे आवश्यक आहे, असे मत नगरसेवक विक्रांत विलास लांडे यांनी व्यक्त केले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे उद्घाटप्रसंगी ते बोलत होते. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष अतिश बारणे, नगरसेवक संजय नेवाळे, निलेश बोराटे, यश दत्ताकाका साने, रामभाऊ बोराटे, सुरेश बारणे, माजी सरपंच हरिभाऊ सस्ते, विजय सस्ते, प्रशांत सस्ते, उत्तम आल्हाट यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतिश बारणे यांनी सार्वजनिक मंडळ व सोसायट्यांना ६१ वृक्षगणेश मूर्ती भेट दिल्या. तसेच, कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता स्वतःच्या जागेमध्ये स्वखर्चाने गणपती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार केला आहे.

### कृत्रिम तलावात विसर्जन

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मोशी गावाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार या परिसरातील रहिवाशांनी ही गणेशमूर्ती इंद्रायणी नदीमध्ये विसर्जित न करता कृत्रिम तलावात विसर्जित करण्याचे आवाहन अतिश बारणे यांनी केले आहे. जे गणेशभक्त तलावात मूर्ती विसर्जित करणार त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.







# पूरग्रस्त बांधवांसाठी धावलो त्यांच्या मदतीला, राष्ट्रवादी पक्ष कार्यकर्ता म्हणजे प्रत्येक हात मदतीचा..!

## एक हात मदतीचा

### आतिष बारणे युवा मंच, सुधाकर भोसले मित्र परिवारातर्फे

# पूरग्रस्तांना मदतीचा हात







मोशी । प्रतिनिधी ।

सांगली जिल्ह्यातील पूरग्रस्तांना एक हात मदतीचा देण्यासाठी मोशी कान्हेवस्ती परिसरातील युवा उद्योजक आतिशशेठ बारणे पाटील युवा मंच व सुधाकर भोसले मित्रपरिवार यांच्यातर्फे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

पूरग्रस्त भागांमध्ये जाऊन त्या नागरिकांना बिसलरी पाणी बोटल, अन्नधान्याचे किट, बिस्कीटचे बॉक्सचे प्रत्यक्षात जाऊन वाटप करण्यात आले. शनिवारी (दि.१०) साखराळे ता. वाळवा येथील राजाराम बापू कारखाना कार्यस्थळावर

**पूरग्रस्त भागातील नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप**

दहा हजार बिसलरी पाण्याच्या बाटल्या, दोनशे कुटुंबांना पुरेल एवढे पाच दिवसांचे अन्नधान्याचे किटसहित बिस्किट बॉक्स देण्यात आले. त्यानंतर तेथून मागणीनुसार बोरगाव, सांगलवाडी येथे त्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी राजवर्धन जयंत पाटील, उद्योजक आतिष बारणे, सुधाकर भोसले, संजय सोळंकी यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

वैयक्तिक अडचणींच्यावेळी पूरामध्ये अडकलेल्या नागरिकांना माणुसकीच्या नात्याने मदतीचा हात देणे गरजेचे होते. त्यामुळे आपल्या टीम ने नियोजन करून प्रत्यक्षात सांगली जिल्ह्यात जाऊन मदतीचा हात दिला असल्याची माहिती युवा उद्योजक आतिश बारणे यांनी पुणे न्यूज एक्सप्रेसशी बोलताना दिली.

---

पुढारी



पूरग्रस्तांसाठी देण्यात येणाऱ्या साहित्याचा ट्रक रवाना करताना राजवर्धन पाटील, आतिष बारणे, सुधाकर भोसले, संजय सोळंकी आदी.

# कोल्हापूर, सांगलीतील पूरग्रस्तांना मदत

**पिंपरी:** सांगली, कोल्हापूरमधील पुरग्रस्तांना मोशीतील उद्योजक आतिश बारणे, सुधाकर भोसले मित्र परिवारांकडून बिसलरी पाणी बोटल, अन्नधान्याचे किट, बिस्कीटचे बॉक्स प्रत्यक्षात पूरग्रस्त भागात जाऊन देण्यात आले.

शनिवारी (दि.१०) साखराळे ता. वाळवा येथील राजराम बापू कारखाना कार्यस्थळावर दहा हजार बिसलरी पाण्याचा बाटल्या, दोनशे कुटुंबाना पुरेल येवढे पाच दिवसांचे अन्नधान्याचे किटसहित बिस्कीट बॉक्स देण्यात आले. त्यानंतर तेथून मागणीनुसार बोरगाव, सांगलवाडी येथे त्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी राजवर्धन जयंत पाटील, उद्योजक आतिष बारणे, सुधाकरण भोसले, संजय सोळंकी यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

## स्व. दत्ताकाका साने यांच्या वाढदिवसानिमित्त घोरावडेश्वर मंदिर येथे वृक्षारोपण









# महिलांचा आत्मसन्मान वाढवुया, सक्षमीकरणातुन स्वावलंबी बनवुया.

**महिला सक्षमीकरणासाठी बचत गटाला 25 हजार रुपयांची आर्थिक मदत केली.**
**स्वावलंबीकरणासाठी मोफत मशीन क्लास सुरु केले.**







## प्रत्येकाला मिळवून देऊ, त्याचा अधिकार
## युवकांसाठी उघडले रोजगाराचे दार..!

# युवावर्गासाठी रोजगार महोत्सव






# रक्ताचा एक थेंबही असे परमेश्वराचे दान..
# रक्तदान करणे, म्हणजे माणुसकीची शान..

## कोरोना काळात रक्ताचा तुटवडा कमी करण्यासाठी रक्तदान शिबिर













# कोरोना संकट काळात आम्ही लढलो लोकांसाठी..!
# लोकांच्या या जगण्यासाठी, जनतेच्या कल्याणासाठी..!

## कोविड काळात गरजूंना आवश्यक साहित्य वाटप








# शास्तीकराच्या प्रश्नावर आवाज उठवला आम्ही वेळोवेळी, पार्थ दादांच्या साथीने केला पाठपुरावा वेळोवेळी..!

## शास्तीकर माफी साठी पार्थ पवार यांची भेट

शास्तीकर विलंब शुल्क शंभर टक्के माफ करावे. मिळकत करामध्ये 50 टक्के ते 75 टक्के अशी सवलत दिली जावी अशी पिंपरी चिंचवडकरांची मागणी होती. मात्र शास्तीकर थकबाकी वगळून मूळ कर स्वीकारला जात नव्हता. त्यामुळे नागरिकांची थकबाकी वाढली. अनेक वर्षांपासून नागरिक मूळ कर भरण्यास तयार होते. मात्र मनपा स्वीकार करत नसल्यामुळे आता शास्तीसह मूळ कर भरणे आवश्यक झाले आहे. कोरोनामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक परिस्थिती बदलली. त्यामुळे शास्तीमध्ये शंभर टक्के सवलत देण्यात यावी अशी मागणी पार्थ पवार यांच्याकडे केली.





जा.क्र.:

**पिंपरी चिंचवड शास्तीकर निर्मूलन समिती**

कार्यालय पत्ता :- गट क्रमांक.१७७, लक्ष्मी कॉम्प्लेक्स, गणेश नगर, तळवडे, पुणे - ४१२०६२

फोन नंबर :- ९८२२०७३३७४

एकच जिद्द शास्तीकर रद्द.

श्री. विलासशेठ लांडे, अध्यक्ष | श्री. धनंजय भालेकर, उपाध्यक्ष | श्री. विनायक रणसुंभे, सचिव | यश दत्ताकाका साने, कार्याध्यक्ष

दि.२३/०१/२०२१

प्रति,
मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब,
उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री -पुणे,
महाराष्ट्र राज्य मंत्रालय,मुंबई.३२

संदर्भ -मिळकतकर अभय योजना २०२०-२०२१ (पिंपरी चिंचवड मनपा)

विषय -मनपा शास्ती (विलंब शुल्क) १०० % माफ करून मिळणेबाबत...

महोदय,

प्रथमतः गेली अनेक वर्षे प्रलंबीत असलेली शास्तीकर वगळुन मुळकर भरण्याची मागणी आपण पुर्ण केल्या बद्दल आपले पिंपरी चिंचवड शहरवासीयांच्या वतीने हार्दीक आभार.

वरील विषयास अनुसरून आपणास विनंती करण्यात येते की मुळकर भरणा करणेसाठी मनपा आयुक्तांनी आपल्या अधिकारात मिळकतकरामधील मनपा शास्तीकर ७५ % व ५० % अशी दोन टप्प्यात सवलत दिली आहे. आजपर्यंतचे थकीत मिळकतदार यापुर्वी शास्तीकर वगळुन मुळकर स्विकारला जात नव्हता त्यामुळे त्यांची थकबाकी वाढली आहे. त्यामुळे त्या प्रमाणात मनपा शास्ती (विलंब शुल्क) देखील वाढली आहे. गेली अनेक वर्षे नागरीक मुळकर भरण्यासाठी तयार होते परंतु तशी सुविधा नसल्यामुळे ते नागरीक थकबाकीदार झाले. कोरोनाच्या महामारीमुळे नागरीकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झालेली असून मुळकर व मनपा शास्ती भरणे अत्यंत जिकरीचे झाले आहे.

तरी कृपया आपण मनपा आयुक्तांना मनपा शास्तीमध्ये १०० % सवलत देण्याचे आदेश देऊन नागरीकांना दिलासा द्यावा हि नम्रतेची विनंती.

कळावे.

अध्यक्ष, श्री. विलास लांडे | उपाध्यक्ष, श्री. धनंजय भालेकर | सदस्य, श्री. विलास मडे | सदस्य, श्री. राजेंद्र थेटे

# कोरोना काळात अन्नधान्य व मास्कचे वाटप केले सामाजिक बांधिलकी जपत योगदान आम्ही दिले..!

## कोरोनाच्या काळात फेस शिल्ड, मास्क व अन्नधान्याचे वाटप








# स्वच्छ सुंदर इंद्रायणी माई, पावित्र्य तिचे राखावे,
# पर्यावरण वाचवावे, नदी प्रदूषण रोखावे..!

## इंद्रायणी माई नदी प्रदुषण रोखण्यासाठी व भविष्यात उपाय योजनांसाठी पर्यावरण मंत्री अदित्यजी ठाकरे यांच्याकडे मागणी



पुढारी

# इंद्रायणी नदीच्या प्रदूषणात वाढ

- रसायनमिश्रित पाणी मिसळण्याचे प्रमाण वाढले
- एसटीपी प्रकल्पाला दिरंगाई; पर्यावरण विभागही सुस्त

**नदी प्रदूषित करणाऱ्यांवर कारवाई करणार**

**सांडपाणी प्रकल्प मंजुरीसाठी पाठविला**

**पर्यावरणमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार**

अतिश आनंदराव बारणे

**पर्यावरणमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार**

इंद्रायणी नदीचे पावित्र्य राखण्याचे काम सर्वांचे आहे. परंतु प्रदूषण नियंत्रण महामंडळ आणि मनपा पर्यावरण विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे इंद्रायणी नदी दिवसेंदिवस प्रदूषित होत आहे. याबाबत पर्यावरणमंत्रिमहोदय यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करणार आहे.

- अतिश बारणे

उपाध्यक्ष, शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी





# जागर सामाजिक कामांचा, जागर विकासकामांचा, प्रत्येकाला हात मदतीचा, आपुलकीचा..!

## अतिश बारणे युवा मंचाच्या माध्यमातून विविध सामाजिक कामे








# दिनदर्शिका उद्घाटन सोहळा मान्यवरांच्या हस्ते
# भविष्य व्हावे सर्व सुखकर हेच यातून दिसते..!

## आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण







पुढारी

दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना ना. जयंत पाटील ना. धनंजय मुंडे, खा. अमोल कोल्हे, विलास लांडे अजित गव्हाणे, विक्रांत लांडे, अतिश बारणे आदी

### पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दिनदर्शिकेचे प्रकाशन

पिंपरी : राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष अतिश बारणे यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन प्रदेशाध्यक्ष व जलसंपदामंत्री जयंत पाटील व सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते बुधवारी (दि.९) करण्यात आले.

भोसरीतील राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या प्रांगणावर कार्यक्रम पार पडला. यावेळी खा. अमोल कोल्हे, आ. अशोक पवार, माजी आ. विलास लांडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे-पाटील, उपाध्यक्ष अतिश बारणे, पालिका विरोधी पक्षनेते राजू मिसाळ, नगरसेवक अजित गव्हाणे, विक्रांत लांडे, संजय वावळे, उत्तम आल्हाट, धनंजय भालेकर आदी उपस्थित होते. पक्षकामात हिरीरीने सहभाग घेणाऱ्यांचा ओढा पक्षाकडे वाढत आहे. प्रत्येकाच्या मनावर पवार अधिराज्य गाजवित आहेत. त्यांना आदर्श मानून उपाध्यक्ष अतिश बारणे उत्तम काम करीत आहेत. पक्ष जबाबदारी यशस्वीपणे पेलणे, पक्षादेशानुसार ताकदीने उभे रहाण्याचे त्यांचे काम वाखाणण्याजोगे आहे. त्यांचा आदर्श पक्षातील इतरांनी घेतला पाहिजे, असे प्रतिपादन सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.

**अतिश आनंदराव बारणे**

शहरउपाध्यक्ष

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिं.चि.शहर जिल्हा

# मोशी परिसरामध्ये गणेशोत्सवा निमित्त प्रत्येक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास चांदीची मूर्ती व भेटवस्तू दिल्या













## श्री क्षेत्र भीमाशंकर येथे आदिवासी भागातील नागरिकांना
## दिवाळी फराळ वाटप अतिश बारणे युवा मंच यांच्या वतीने करण्यात आले








## मोशीतील ग्रामस्थांना वाचनाची आवड जोपासता यावी तसेच तरुणांमध्ये वाचनसंस्कृती रुजवावी यासाठी मोशीमध्ये विविध ठिकाणी अतिश बारणे यांच्या वतीने सार्वजनिक वाचनालय उभारण्यात आले

डी मार्ट




मोशी बाजार समिती




वूडस व्हीला फेज - 2
जाधववाडी मोशी रोड




अनंत नगर सिल्व्हर ओक



## प्रभू श्रीराम मंदिर उभारणीसाठी देणगी स्वरूपात 51 हजार रुपयांची देणगी सुपूर्त करण्यात आली.

**श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्यानगरी मंदिर निर्माण कार्यासाठी निधीसंकलन अभियानास एक्कावन्न हजार रुपयाचा धनादेश सुपूर्त केला. देशभरात सुरु असलेल्या या अभियानात बारणे यांनी खारीचा वाटा उचलला. अभियानात सहभागी होण्याचे भाग्य मिळाल्याचे यावेळी बारणे म्हणाले सर्वांनी यथा शक्ती योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी जनतेला केले.**

# अयोध्येतील राम मंदिरासाठी प्रत्येकाने खारूताई ऐवढा वाटा उचलावा

### राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष आतिष बारणे यांचे आवाहन, पन्नास हजार रूपयांचा धनादेश सुपूर्द

मोशी। दि. २७ । प्रतिनिधी

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र आयोध्यानगरीमध्ये भव्य राम मंदिर निर्माण कार्यास प्रारंभ झाला असून, राम मंदिर निर्माण कार्यासाठी निधीसंकलन अभियान देशभरात चालू आहे. या अभियानास पिंपरी-चिंचवड शहरातही चांगला प्रतिसाद मिळत आहे. श्रीराम मंदिर निर्माण कार्यासाठी राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष आतिष बारणे यांनी अभियानात सहभाग नोंदवत पन्नास हजार रूपयांचा धनादेश सुपूर्द केला आहे.

देशभरात चालू असलेल्या या अभियानामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद,बजरंग दल,समेत साधु संत मंहत, वारकरी संप्रदाय व सर्व हिंदू संघटना द्वारा निधि संकलन




कार्य सुरू असून, पिंपरी-चिंचवड शहरातूनही मोठ्या प्रमाणात निधी संकलन सुरु आहे.मोशीमध्ये राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष आतिष बारणे यांनी या अभियनात सहभाग नोंदवुन, इतरांनीही या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना, आतिष बारणे म्हणाले, की आयोध्या येथे प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिर निर्माण कार्य होत आहे.श्रीराम जन्मभूमीवर भव्य मंदिर म्हणजे भारतीय मनाची शाश्वत प्रेरणा आहे. श्रीराम जन्मभूमीत भव्य मंदिर बनण्याबरोबरच जनतेच्या हृदयात श्रीराम आणि त्यांच्या जीवन मूल्यांची प्रतिष्ठापना व्हावी,या अनुषंगाने सर्वात मोठ्या प्रमाणात निधी समर्पण अभियानाची सुरुवात झाली आहे.

संपूर्ण जगभरातून प्रत्येकजण अयोध्येतील श्रीराम मंदिर निर्माणासाठी निधी संकलन करून यथाशक्ती योगदान देत आहे. या पुण्ययज्ञात आपल्याला खारूताई ऐवढा वाटा देता आला, आणि अभियानात सहभागी होण्याचे भाग्य मिळाले आहे. प्रत्येकाने या चांगल्या कामासाठी खारूताई ऐवढाच वाटा उचलून अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन बारणे यांनी केले. यावेळी मोशी येथील काही उद्योजक उपस्थित होते.

## श्री कानिफनाथ सेवा ट्रस्ट मंदिर उभारणीसाठी 51 हजार रुपयांची देणगी सुपूर्त करण्यात आली.



श्री कानिफनाथ सेवा ट्रस्ट

1135

Corpus Donation

Letter for Corpus Donation

Name:

Address:

Date:

The President / Secretary / Trustee
Shree Kanifnath Seva Trust

Dear Sir / Madam,
Sub: Corpus donation to your trust

# प्रसार माध्यमांनी घेतली कामाची दखल

**न्यूज एक्सप्रेस** मराठी

मोशी परिसरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरु

**आजच्या पिढीने मराठी साहित्याचे वाचन करावे**

**खासदार श्रीनिवास पाटील**

'माय माझी इंद्रायणी' आणि 'वेध सामाजिक जाणिवांचा' या अरुण बो-हाडे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

**शबनम न्यूज**

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अतिश बारणे यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**आतिश बारणे यांनी घेतली महाराष्ट्र राज्यमंत्री दत्ता भरणे यांची भेट**

**पुढारी**

**इंद्रायणी नदीच्या प्रदूषणात वाढ**

**पिंपरी-चिंचवड**

**जागतीक कृषी दिन व आषाढी वारी**

निमीत्त हारीत वारीचा संकल्प..

**न्यूज एक्सप्रेस**

आदिवासी पाड्यावरील नागरिकांची **दिवाळी झाली गोड..!**

**पुढारी**

**इंद्रायणीच्या प्रदूषणाबाबत खा. कोल्हेंची नाराजी**

मोशीतील समस्यांचा आढावा; महापालिका आयुक्त, प्रदूषण नियंत्रण मंडळाबरोबर करणार चर्चा

**पुणे न्यूज एक्सप्रेस**

**कोरोनाविरुद्धच्या लढाईत अतिश बारणेंचे योगदान**

**पुढारी**

**मोशीतील पर्यावरणपूरक उत्सवाचा आदर्श घ्यावा**

**पुढारी**

**कोल्हापूर, सांगलीतील पूरग्रस्तांना मदत**

**शबनम न्युज**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शास्ती (विलंब शुल्क) शंभर टक्के माफ करा - माजी आमदार विलास लांडे

**न्यूज एक्सप्रेस** मराठी

**शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोशीत रक्तदान शिबिर**

**न्यूज एक्सप्रेस** मराठी

**कर्णबधीर बांधवांसाठी मोफत श्रवणयंत्र वाटपाचा बुधवारी कार्यक्रम**

**खंडित वीजपुरवठ्याने उपकरणांचे नुकसान**

तक्रारीची दखल नाही; मोशीतील नागरिक त्रस्त

**शबनम न्युज**

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अतिश बारणे यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**पुढारी**

**दुय्यम निबंधक कार्यालय सुरू**

**पुढारी**

**हरवलेल्या कृतिकाला मिळाले आई-वडील**

**न्यूज एक्सप्रेस**

अयोध्येतील राम मंदिरासाठी प्रत्येकाने खारुताई ऐवढा वाटा उचलावा

**शबनम न्युज**

**अतिश बारणे यांच्या पुढाकाराने मोशी मध्ये प्रथमच पर्यावरण पूरक गणेशोत्सव**

**मोशीतील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा**

**पुढारी**

**मोशीतील वाहतूक समस्या सोडविण्याची मागणी**

आतिश बारणे यांनी दिले खासदार कोल्हे यांना निवेदन

# • माझे गाव माझा व्हिजन •

- पवित्र इंद्रायणी नदीतील प्रदूषण रोखून स्वच्छ सुंदर इंद्रायणी बनविणार.
- वाढते नागरिकीकरण लक्षात घेऊन नागरिकांना रस्ते, वीज, पाणीपुरवठा, आरोग्यसुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी प्रयत्नशील राहणार .
- मोशीतील सोसायटी मधील रहिवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्या मार्गी लावणार.
- सुशिक्षित बेरोजगार तरुण तरुणींना नोकरी व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देणार.
- महिला भगिनींचे बचत गटाच्या माध्यमातून संघटन निर्माण करून शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणार.
- महिला भगिनींची सुरक्षा आणि सक्षमीकरण यासाठी आवश्यक विविध पैलूंवर ठोस काम करणार.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र यासारखे विविध उपक्रम राबविणार.
- विद्यार्थांसाठी डिजिटल आधुनिक शिक्षणप्रणाली विकसित करणार.
- प्रभागातील प्रलंबित विविध प्रकल्प उभारण्यासाठी पाठपुरावा करणार.
- सोसायटीधारकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार.
- प्रभागात उद्यान, अद्ययावत क्रीडांगण, सांस्कृतिक भवन उभारणार.

# माझे मार्गदर्शक म्हणतात



## मा.श्री. हरिभाऊ सस्ते (मा. सरपंच)

अतिश हे कायम हाकेला उभे असतात . रात्री अपरात्री कोणतीही अडचण आल्यास मदतीला उभे असतात. शिवाय प्रत्येकाच्या सुखदु:खाचा कार्यक्रम त्यांनी आतापर्यंत चुकवला नाही. माणूस म्हणून प्रत्येकाच्या सुख दु:खात ते व्यक्तीगत उपस्थित असतात. याचा हेवा मला वाटतो.



## मा.श्री. अरुण बोऱ्हाडे (स्वि. नगरसेवक पिं चिं मनपा)

लहानपणापासून अतीशला जवळून पाहिले आहे. त्याच्याकडे जिद्द व चिकाटी आहे. शिवाय मेहनती आहे.घरात वारकरी वारसा असल्याने संस्कार आहेत. नक्कीच मोशीत विकास परिवर्तन आणण्यात त्याचा सिंहाचा वाटा राहील. खऱ्या अर्थाने तो नगरसेवक पदाला पात्र आहे .



## मा.श्री. उत्तम आल्हाट (अध्यक्ष भोसरी विधानसभा)

सामाजिक कामात नेहमीच अग्रेसर असा अतिश आहे .
कौटुंबिक स्नेह जपण्याचा त्याचा स्वभाव आहे. कोणतीही अडचण असल्यास सहानुभूती पूर्वक विचारणा असते.



## ह.भ.प. श्री. धोंडिबा आल्हाट

धडपड व चिकाटी सलाम करण्यासारखी आहे.
आजही त्याचे अप्रूप वाटते. केवळ राजकारण न करता सामाजिक कामात हि तितकाच तो सक्रिय आहे.



## मा.श्री. रमेश गायकवाड (संचालक हवेली सहकारी बँक मर्यादित, मोशी)

बारणे कुटुंबासोबत अनेक वर्षांचा स्नेह आहे. अतिश सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम राबवित आहे. ते कौतुकास्पद आहे युवकांनी समाजकार्यात अग्रेसर राहून समाजाची सेवा करावी.
अतिशच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा !



## मा.श्री. मनोहर वलोकर (अध्यक्ष एकता ज्येष्ठ नागरिक संस्था मोशी)

अतिश अनेक सामाजिक संस्थाशी जोडले गेले आहेत.
समाजाची सेवा करणे हे त्यांचे व्रत आहे .कोरोना काळात गरिबांचे अश्रू पुसण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या हातून असेच समाज कार्य घडत राहो ही सदिच्छा !



## ह.भ.प. श्री. किसनबाबा बोराटे (सामाजिक कार्यकर्ते)

अतिश लहानपणापासून अतिशय नम्रशील आहे. जेष्ठ व्यक्तींना नेहमी आदर देतो.
जेष्ठ नागरिकांसाठी सार्वजनिक वाचनालयासारखे अनेक चांगले उपक्रम त्याने मोशीमध्ये केले आहेत.

## शहराच्या विकासात मानाचा तुरा रोवलेल्या शिलेदारांना भावपूर्ण श्रद्धांजली



**कै.मा.श्री. दत्ता काका साने**
(कार्यसम्राट नगरसेवक, विरोधी पक्ष नेता)



**कै.मा.श्री. रंगनाथ दादा फुगे**
(मा.महापौर)



**कै.मा.श्री. जावेद शेख**
(कार्यसम्राट नगरसेवक)

भावपूर्ण श्रद्धांजली


संकल्प पुन्हा... जनतेप्रती बांधिलकीचा,
निश्चय पुन्हा... विकसनशील वचनपुर्तीचा..!
राष्ट्रवादी पुन्हा
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
आरंभ
नव्या पर्वाचा...